साप्ताहिक
# परळी परिसर
* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ०९ डिसेंबर २०२४ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## नगरपालिका, महानगरपालिकेच्या निवडणुका लवकरच होणार.!

नवी दिल्ली (वृत्तसंस्था):- गेल्या अडीच-तीन वर्षांपासून रखडलेल्या राज्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिकांसह इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ज्या कारणांमुळे रखडल्या आहेत त्याचे वर्गीकरण करावे, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने गेल्या शुक्रवारी (दि.६) पारीत केले आहेत. त्यामुळे राज्यात लवकरच या संस्थांच्या निवडणुका होणार असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

राज्यातील महानगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांसह स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत संपली आहे. मुदत संपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांवर गेल्या अडीच-तीन वर्षांपासून प्रशासक नियुक्त आहे. सत्तेची विकेंद्रीकरण करण्याच्या हेतुने भारतीय राज्यघटनेत स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करण्यात आली होती. अडीच वर्षांपूर्वी तत्कालिन महाविकास आघाडी सरकारने महानगर पालिका निवडणुकांसाठी प्रभाग पद्धती अंमलात आणण्याचा निर्णय घेतला होता. एका प्रभागातून चार नगरसेवकांची तरतूद करण्यात आली होती. सदस्यीय प्रभाग रचना करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार महापालिका निवडणुकांच्या सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या. त्यानंतर पुन्हा एकदा राज्यात एकनाथ शिंदे यांनी बंड पुकारत महायुतीचे सरकार आणले. त्यावेळेस त्यांच्या सरकारने आगामी महापालिका निवडणुका तीन सदस्यीय प्रभाग रचनेनुसार होतील, हा निर्णय कायम ठेवला होता. पण, त्याच वेळी महाविकास आघाडीने वाढविलेली सदस्य संख्या कमी केली. त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित होती. त्यापाठोपाठ आरक्षणावरुन देखील सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल झाली होती. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असतांनाच महायुतीच्या सरकारने तीन सदस्यीय प्रभाग रचनेच्या निर्णयात बदल करून, ही रचना ४ सदस्यांची केली. याप्रकरणी ईशाद या संस्थेकडून सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आलेली आहे. या याचिकेवरील सुनावणी करताना न्यायालयाने महत्त्वाची टिपण्णी केली आहे. विविध कारणांमुळे या निवडणुका लांबणीवर पडल्या होत्या. ज्या कारणांमुळे निवडणुका रखडल्या आहेत, त्या कारणांचे वर्गीकरण करण्याचे आदेश हे सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे लवकरच राज्यात या संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होवून आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या पहिल्याच पत्रकार परिषदेत लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांसह महापालिकांच्या निवडणुका लागतील, असे विधान केले होते. ते म्हणाले होते की, महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न होणे चुकीचे आहे. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात रखडलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिल्यावर लगेचच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जातील. असे त्यांनी सांगितले होते. ***

## अमृत विकास संस्थेवर बाजीराव धर्माधिकारी यांची सल्लागार म्हणून निवड

परळी वैजनाथ, (बातमीदार):- राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी, युवक, युवती इत्यादीचा विकास घडविण्याकरीता, महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेची स्थापना करण्यात आलेली आहे. 'अमृत' संस्थेवर परळीचे माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांची सल्लागार सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

अमृत संस्थेच्या नियामक मंडळाच्या दिनांक १९/०४/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमधील मुद्दा क्रमांक १३ नुसार सल्लागार समिती, निवड समिती किंवा इतर आवश्यक त्या कार्यासाठी, आवश्यक त्या विषयांच्या समित्या नेमण्याचे व त्यांच्या वेळोवेळी बैठका घेणे, याचा अधिकार व्यवस्थापकीय संचालक अमृत यांना प्रदान करण्यात आला आहे. त्यानुसार अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी सदस्यांची नियुक्ती करून अमृत विकास सल्लागार समितीची स्थापना केली आहे. या नियुक्तीबाबतचे अधिकृत कार्यालयीन आदेश आज दि.६ डिसेंबर २०२४ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. यामध्ये परळीचे माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात काम करणारे बाजीराव भैय्या धर्माधिकारी हे परळीचे माजी नगराध्यक्ष व परळी वैजनाथ येथील विद्यमान राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक,



सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रात ते सातत्याने कार्यरत आहेत. तरुण नगराध्यक्ष म्हणून त्यांनी यशस्वी कारकीर्द निर्माण केलेली आहे.विद्यमान राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष म्हणून त्यांचे राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे.विविध संस्थांच्या माध्यमातून त्यांनी कार्य केलेले आहे. त्याचबरोबर परळी येथे झालेल्या राज्यस्तरीय ब्राह्मण ऐक्य परिषदेचे ते संस्थापक आहेत. त्यांचे सामाजिक कार्य व क्षमता लक्षात घेऊन त्यांची महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेवर सल्लागार सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या समितीवर विजय जोशी, व्यवस्थापकीय संचालक, अमृत, पुणे. हे अध्यक्ष असुन डॉ. प्रिया देशपांडे, निबंधक, अमृत, पुणे सदस्य सचिव म्हणून काम करतील. सल्लागार सदस्य म्हणून बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्यासह क्षितिज पाटुकले, निखिल लातूरकर,विश्वजीत देशपांडे पुणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल सर्व नवनियुक्त सदस्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

दरम्यान, या नियुक्तीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करतांना बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले की,ज्या खुल्या प्रवर्गातील जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग / संस्था /महामंडळामार्फत योजनांचा लाभ मिळत नाही, अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवती व इतर उमेदवारांसाठी विविध उपक्रम, कार्यक्रम इत्यादी राबविण्यात येवून व इतर माध्यमातूनही विद्यार्थी, युवक-युवती इत्यांदीचा विकास घडविण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या संस्थेच्या माध्यमातून धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील गरजूंना अधिकाधिक लाभ मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करु असा विश्वास बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी व्यक्त केला आहे.या नियुक्तीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व शासनाचे त्यांनी आभार व्यक्त केले आहेत. ***

## माझ्यावर दाखल केलेला विनयभंगाचा गुन्हा हा केवळ खंडणीच्या उद्देशानेच-डॉ.बालाजी फड

परळी वैजनाथ, (बातमीदार):-

माझ्यावर दाखल करण्यात आलेला विनयभंगाचा गुन्हा हा केवळ खंडणीच्या उद्देशानेच दाखल करण्यात आलेला आहे.तो पूर्णपणे खोटा आहे. याबाबत पोलिसांना आठ दिवसापूर्वी मी लेखी तक्रार दिल्यानंतरही माझ्यावर गुन्हा दाखल झाला असे मत परळी येथील बालरोग तज्ञ डॉ. बालाजी फड यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले. तसेच परळीतील डॉक्टरांना बदनाम करण्याचे षडयंत्र केले जात असल्याचेही ते म्हणाले.

याबाबत पत्रकारांशी बोलताना डॉ. बालाजी गुट्टे पुढे म्हणाले की, माझ्यावर गुन्हा दाखल करणा-या नेहा परमार यांच्या विरोधात मी दिनांक २७ नोव्हेंबर रोजी तक्रार दिली होती.

यामध्ये मला पैशाची मागणी करण्यात येत असून विनाकारण त्रास देण्यात येत आहे असे नमूद केले होते. संभाजीनगर पोलिसांनी त्यावेळी गुन्हा दाखल केला नाही. परंतु २ डिसेंबर रोजी नेहा परमार हिने माझ्या रुग्णालयात येऊन माझ्यासह पत्नी व माझ्या कर्मचाऱ्यास



मारहाण केली व आमच्यावरच विनयभंगाचा खोटा गुन्हा दाखल केला. आणि पोलिसांनी कोणतीही शहानिशा न करता गुन्हा दाखलही केला.

नेहा परमार ऊर्फ नाजनीन अ.लुलानीया मॉ. रशीद या महिलेने विनयभंग व मारहाणीचा जो गुन्हा दाखल केला तो गुन्हा माझ्या डॉक्टरी पेशाची बदनामी करून माझ्याकडून खंडणी वसूल करण्यासाठीच दाखल केला असून सदरील महिला प्रचंड फ्रॉड असून या महिलेकडे दोन बनावट आधारकार्ड असल्याचे ते म्हणाले. मी मागील सुमारे १८ वर्षापासून वैद्यकीय क्षेत्रात प्रामाणिकपणे सेवा देत आहे. प्रामाणिकपणे सेवा देणाऱ्या व्यक्तीला बदनाम करण्याचे काम केले जाते आहे. हे षडयंत्र परळीतील समाजाने हाणून पाडले पाहिजे व सत्य ओळखून या प्रवृत्तीना वेळीच पोलिस प्रशासनाने पायबंद केले पाहिजे असेही पत्रकार परिषदेत बोलताना डॉ.बालाजी फड़ यानी सांगितले. ***

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची पहिली स्वाक्षरी वैद्यकीय मदतीच्या फाईलवर

### पुण्याच्या रुग्णाला पाच लाखांची मदत


मुंबई (जि.मा.का.):- मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी पहिली स्वाक्षरी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर केली.

पुणे येथील रुग्ण चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना पाच लाखाची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून देण्याचे निर्देश त्यांनी फाईलवर दिले आहेत. चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली होती.

## श्री बजरंगबली वेताळ मंदिर येथे श्री दत्त जन्मोत्सवाचे आयोजन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील जागृत देवस्थान श्री बजरंगबली वेताळ मंदिर येथे शनिवार दिनांक १४ डिसेंबर रोजी श्री दत्त जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संयोजक प.पू.विलासानंदजी महाराज यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

मित्ती मार्गशीर्ष शु.१४ शके १९४६ शनिवार दिनांक १४ डिसेंबर रोजी पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ मंदिरजवळील जागृत देवस्थान



श्री बजरंगबली वेताळ मंदिर येथे श्री दत्त जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त विविध धार्मीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दुपारी १२ ते १ वा. महाआरती, भजन, कीर्तन आदी कार्यक्रम होणार आहेत.

या धार्मीक कार्यक्रमाचा परळी शहर व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन लाभ घ्यावा असे आवाहन श्री बजरंगबली वेताळ मंदिराचे संयोजक प.पू.श्री विलासानंदजी महाराज यांनी केले आहे. ***

# मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी तर उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी घेतली शपथ

मुंबई, (जि.मा.का.):-राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस यांना मुख्यमंत्री पदाची शपथ दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत ऐतिहासिक आझाद मैदानावर झालेल्या शपथविधी समारंभात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यासमवेत उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, अजित आशाताई अनंतराव पवार यांना राज्यपालांनी पद आणि गोपनियतेची शपथ दिली. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी शपथविधी सोहळ्याचे संचलन केले.

आजच्या शपथविधी कार्यक्रमास मंचावर केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय आरोग्य मंत्री जगतप्रकाश नड्डा, केंद्रीय भूपृष्ठ परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय कृषि मंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पियुष गोयल, केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर, केंद्रीय पर्यावरण मंत्री भुपेंदर यादव, केंद्रीय माहिती तंत्रज्ञान व रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय अवजड उद्योगमंत्री एच डी कुमारस्वामी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय सूक्ष्म मध्यम लघू उद्योगमंत्री जितनराम मांझी, केंद्रीय दळणवळण मंत्री जोतिरादित्य सिंधिया, केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू, केंद्रीय मत्स्य व्यवसाय व पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह, केंद्रीय अन्न प्रक्रिया



उद्योगमंत्री चिराग पासवान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू, आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा शर्मा, छत्तीसगढचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, मेघालयचे मुख्यमंत्री कॉनरॅड संगमा, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, त्रिपुराचे मुख्यमंत्री मानिक साहा, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, पुदुचेरीचे मुख्यमंत्री एन रंगस्वामी, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन मांझी, मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह, नागालँडचे मुख्यमंत्री नेफ्यु रिओ, सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग, केंद्रीय राज्यमंत्री सर्वश्री रामदास आठवले, मुरलीधर मोहोळ, प्रतापराव जाधव, रक्षाताई खडसे, विविध राज्याचे उपमुख्यमंत्री सर्वश्री केशव प्रसाद मौर्य, ब्रजेश पाठक, पवन कल्याण, राजेंद्र शुक्ला, अरुण सावो, विजय शर्मा, प्रेमचंद बैरवा, विजयकुमार सिन्हा, सम्राट चौधरी, कनक बर्धन सिंह देव, प्रवती परिदा, चौना मेन, प्रेस्तोन त्यांसोंग, यांथुंगो पटॉन, टी. आर. झेलियांग, एस धार, श्रीमती दिया कुमारी यांच्यासह साधू, संत, महंत, विविध धर्मांचे गुरु, राज्यातील खासदार, आमदार, विविध राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते, उद्योग, क्रीडा, मनोरंजन क्षेत्रातील विविध मान्यवर, विशेष निमंत्रित अतिथी उपस्थित होते. शपथविधी सोहळ्याची सुरुवात राष्ट्रगीत व राज्य गीताने करण्यात आली. ***

# सिरसाळा एमआयडीसी पूर्णत्वाच्या दिशेने आ.मुंडे यांचे महत्वाचे पाऊल

## प्रस्तावित केलेल्या औद्योगिक क्षेत्र विकास आराखड्यास एमआयडीसी ने दिली मंजुरी

मुंबई (बातमीदार):- परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी परळी तालुक्यातील शिरसाळा येथे औद्योगिक विभागाने अधिग्रहीत केलेल्या जागी पंचतारांकित एमआयडीसी पूर्ण करण्याचा ध्यास घेतलेला असून एमआयडीसीमध्ये प्रत्यक्ष उद्योगांना सुरुवात करण्याच्या दृष्टीने एमआयडीसी पूर्णत्वाच्या साठी अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

धनंजय मुंडे यांच्या विनंतीनुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे शिरसाळा येथे अधिग्रहित करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवर औद्योगिक क्षेत्रात पूरक बाबी विकसित करण्यास औद्योगिक विकास महामंडळाने मंजुरी दिली असून, यामध्ये प्रामुख्याने २० मीटर मुख्य रस्ता, १२ मीटर अंतर्गत रस्ते, १५ मीटर सर्व्हिस रस्ते यांसह लघु व मध्यम उद्योगांसाठी राखीव जागा (प्लॉट) निर्मितीसाठी त्याचबरोबर सहाय्यभूत सुविधा निर्माण करण्याच्या प्रस्तावास औद्योगिक विकास महामंडळाने



मंजुरी दिली आहे.

सिरसाळा येथे अधिग्रहित करण्यात आलेल्या जमिनीवर एकूण १६ हेक्टर क्षेत्र हे संबंधित सुविधांसाठी मंजुर करण्यात आले असून, यासाठी धनंजय मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

धनंजय मुंडे यांनी नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिरसाळा येथील मंजूर असलेल्या एमआयडीसीला पूर्णत्वाकडे नेऊन या ठिकाणी पायाभूत सुविधांची निर्मिती करणे तसेच येथे उद्योगांना निमंत्रित करण्याचे आश्वासन दिले होते; या शब्दाला पूर्ण करण्यासाठी आणखी आमदार म्हणून शपथ घेणे सुद्धा बाकी असतानाच मुंडेंनी आपल्या कामाला सुरुवात केल्याचे पाहायला मिळत आहे.

सिरसाळ्यात सुमारे २०० हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्र हे एमआयडीसी म्हणून घोषित करण्यात आले असून त्यापैकी ७८ हेक्टर पेक्षा अधिक जमीन आतापर्यंत अधिग्रहित करण्यात आली आहे. सदर ठिकाणास राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे सह दळणवळणाच्या सोयी व पाण्याची उपलब्धता प्रमाणात असल्याने येथे उद्योग उभारणीस मोठा वाव आहे. त्यामुळे सदर एमआयडीसी पूर्ण झाल्यास याठिकाणी मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती करण्याचा धनंजय मुंडे यांचा प्रयत्न आहे. **

# स्वाराती रुग्णालय बनावट औषधी पुरवठा प्रकरण; रुग्णांच्या जीवाशी खेळणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करावी- तुळशीराम पवार

परळी वैजनाथ, (बातमीदार):- गोरगरीब रुग्णांवरील उपचारासाठी आधारस्थान असलेल्या अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयास बनावट औषधींचा पुरवठा करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी चौघाविरुद्ध गुन्हा दाखल ही करण्यात आला आहे. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय म्हणजे गोरगरीब रुग्णांसाठी एक वरदान आहे. गोरगरीब जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या विरुद्ध शासनाने कठोर कारवाई करावी अशी मागणी जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

याबाबत प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की,



सध्याच्या खाजगी रुग्णालयातून मिळणाऱ्या महागड्या उपचारपद्धतीमुळे गोरगरीब आणि सर्वसामान्य रुग्ण स्वस्त आणि खात्रीपूर्वक उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयास प्राधान्य देतात. एका अर्थाने हे रुग्णालय गोरगरिबांसाठी जीवनवाहिनी व वरदान ठरले आहे. मात्र या रुग्णालयात महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या औषध पुरवठा कंत्राटदाराने बनावट औषधीचा पुरवठा केल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत उघड झाले आहे. बनावट औषध निर्मिती आणि विक्रीच्या मागे आंतरराज्यीय टोळी असू शकते. राज्यात त्यांचे जाळे पसरले असण्याची शक्यता या प्रकरणामुळे निर्माण झाली आहे. गोरगरीब जनतेच्या जीवाशी खेळण्याचा हा प्रकार आहे. त्यामुळे या प्रकरणातील जे कोणी दोषी असतील त्यांच्याविरुद्ध तात्काळ अटक करून कारवाई करावी अशी मागणी जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांनी केली आहे.**

# गीतेतील कर्म, विकर्म व अकर्म

कर्म केल्याशिवाय कोणीही सजीव प्राणि क्षणभर सुद्धा राहू शकत नाही. ती कर्मे मग जाणीवपूर्वक केलेल्या हालचालींची ऐच्छिक कर्मे असतील, श्वासोच्छ्वासासारखी अंशत: ऐच्छिक असतील किंवा हृदयस्पंदना सारखी अथवा शरीरातील कुठल्याही पेशीसारखी जाणिवेच्या पलीकडील असतील पण कर्म हे प्राण आहे तोपर्यंत सजीवांकडून घडतच असतात.

या सृष्टीमध्ये पण सतत क्रिया घडतच असतात प्रत्येक अणू,परमाणू मध्ये पण घडत असतात.'' यथापिंडे तथा ब्रह्मांडे'' म्हणजे ज्याप्रमाणे अनंत सूर्य मंडलामध्ये प्रत्येक सूर्याच्या भोवती एका विशिष्ट पद्धतीने सर्व ग्रह चक्राकार गतीने फिरत असतात व ही सर्व मंडळे आकाशगंगेत फिरत असतात तव्दतच प्रत्येक परमाणूमध्ये इलेक्ट्रॉन प्रोटॉन न्यूट्रॉन हे गतिशील असतात.

चेतन आत्मतत्त्व मुक्ती नंतरही ब्रह्मांडामध्ये भ्रमण करतच असतो व स्वतः परमात्माही या सर्व ब्रह्मांडाचे नियंत्रण अहोरात्र करतच असतो.

''मा फलेषु कदाचन''म्हणजे फलाची इच्छा न ठेवता कर्म कर; मुख्य फलावर तुझा अधिकार नाही; हा गीतेचा सर्वश्रुत संदेश आहे. पण या उक्तीचा यथावत् अर्थ न समजल्यामुळेच गीतेविषयी बरेच भ्रम निर्माण होतात.

इच्छेशिवाय , किंवा प्रयोजनाशिवाय कुणी मूर्ख व्यक्ती सुद्धा कर्म करत नाही . स्वतः परब्रह्मही उपनिषदात् , पण म्हटलेले आहे की ज्ञतत् ऐक्षत'', सो अकामयात'',तो सृष्टीच्या निर्मितीची इच्छा करतोच. लीला म्हणून का होईना ''लोकवत् तु लीला कैवल्यं'' (ब्रह्मसूत्र) मग तुम्ही आम्ही कुठल्याही हेतू शिवाय कर्म कसे काय करूत?

गीतेत सांगितले आहे की जो आत्मरत असतो त्याला कुठलेही कर्म करण्याची आवश्यकता नाही; पण तरीही जनकासारखे विदेही पुरूष पण लोकसंग्रहासाठी कर्म करतातच.कर्म केलेच पाहिजे. लोकसंग्रहाचा आजचा अर्थ म्हणजे आपल्या मागे एनकेन प्रकारेन लोकांना आकर्षित करायचे असा नाही; तर सर्व लोकांना सन्मार्गाला लावावयाचे; असा त्याचा अर्थ आहे. मी जर कर्म केले नाही तर सर्व लोक माझेच आचरण करतील; म्हणून मी सुद्धा कर्म करतच असतो; वास्तविक मला कर्म केले काय किंवा न केले काय सारखेच; असे पुरुषोत्तम श्रीकृष्ण स्वतः म्हणतात.

एकंदरीत श्रीकृष्ण गीतेत संदेश देतात की कुणाचाही कर्म सोडून निष्क्रिय राहणे म्हणजे संन्यास असा बुद्धिभेद करू नका.''न बुद्धिभेदं जनएत् अज्ञानानाम् कर्मसंगीनाम्''.

एकंदरीत हेतू शिवाय कुणी कर्म करतच नाही. ते सत्कर्म तरी असेल किंवा दुष्कर्म तरी. कितीही दुष्ट व्यक्ती असली तरी त्याच्या पण अंत:करणात निद्रिस्थ असलेला विवेक जागृत करण्याची संधी त्याला असतेच. तो मला शरण आला तर; म्हणजेच जर कधीतरी अंतर्मुख होऊन त्याचा विवेक जागा झाला तर तो पण सन्मार्गाला लागून त्याला पण सद्गती प्राप्त होऊ शकते; हे गीतेचे आश्वासन आहे.

सर्वसाधारणतः कुठल्याही कर्मात थोडा तरी दोष असतोच; म्हणून माझ्याकडून पाप होईल ह्या भीतीने तू कर्माचा त्याग करू नकोस ; हा गीतेचा मुख्य संदेश आहे. कर्म करण्याचा हेतू फक्त शुद्ध असावा. सोन्यात थोडे तरी तांबे घातल्याशिवाय त्याचा जसा दागिना होत नाही तसेच शुद्ध हेतूने व कमीत कमी दोष असलेले कर्म असावे. दैनंदिन जीवनामध्ये आपल्या आवडीनुसार किंवा परिस्थितीनुसार जे कर्म आपण करतो त्याला कर्म म्हणतात. ते कर्म जर पूर्णपणे मन लावून एकाग्र चित्ताने केले तर त्याला विकर्म म्हणतात. आणि तेच सद्हेतूने, एकाग्र चित्ताने आणि परिणामाची चिंता न करता केले तर त्याला अकर्म म्हणतात. नंतरच नैष्कर्म सिद्धी प्राप्त होत असते.

प्रारंभी पासूनच अकर्म किंवा पूर्णतः निष्काम कर्म जमेल असे नाही. सुरुवातीला आहार विहारावर नियंत्रण ठेवून व सद्ग्रंथांचे वाचन करून; भक्ती पूर्ण अंत:करणाने यम, नियमांचे पालन करत; आसन प्राणायामांचा अभ्यास करून शुद्ध हेतूने मनःपूर्वक कर्म करावे. नंतर ते विकर्म घडेल. नंतरच अकर्माची स्थिती प्राप्त होईल. आणि असे झाल्यानंतरच ज्ञानप्राप्ती होऊन नैष्कर्म सिद्धी प्राप्त होते. त्यालाच जीवन मुक्त पुरुष म्हणतात. आणि मृत्यू समय ती व्यक्ती परमात्म चिंतन करून ब्रह्मरंध्राद्वारे प्राणोत्क्रमण करून विदेह मुक्त होते; म्हणजे जन्ममृत्यूच्या बंधनापासून मुक्त होते आणि अखंड परमानंदामध्ये स्थित होते. हेच जीवनाचे लक्ष्य. ज्याच्या त्याच्या आवडीनुसार व वैशिष्ट्यानुसार प्रत्येकाने भक्ती, कर्म किंवा ज्ञान योगयुक्त अंत:करणाने करावे. समर्पित भावनेने कर्म करणे हीच भक्ती. शेवटी कर्म कुणालाही सुटत नाहीत. कर्म, विकर्म, अकर्म या क्रमाने नैष्कर्म सिद्धी प्राप्त करून घेणे हाच भगवद्गीतेचा संदेश.

**- डॉ.सुरेशचन्द्र चौधरी**
परळी वैजनाथ.

संपादकीय...

# जीवाशी खेळ...!

*** सुविचार ***

अहंकार हा वाऱ्यासारखा असतो, फरक फक्त एवढाच की वाऱ्याने झाडाची पाने तुटतात आणि अहंकाराने जवळची माणसे.!

हैदराबादच्या निजामराजवटीपासून तालुक्याचे ठिकाण म्हणून ओळख असलेले अंबाजोगाई हे शहर पूर्वी मोमिनाबाद व आता अंबाजोगाई या नावाने प्रसिद्ध आहे. परळीच्या शेजारी असलेले हे शहर देवीच्या साडेतीन शक्तीपीठांपैकी एक उपपीठ म्हणून भाविकांत ख्याती असलेले तीर्थक्षेत्र आहे. श्री योगेश्वरी देवीच्या वास्तव्याने पावन झालेली आंबा नगरी आद्यकवी मुकुंदराज व दासोपंतांचीही भूमी आहे. मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या लढ्याची धुरा आपल्या खांद्यावर पेलणारे स्वामी रामानंद तीर्थ यांचीही ही कर्मभूमी आहे. वैद्यकीय महाविद्यालयामुळे गेल्या चाळीस-पन्नास वर्षापासून अंबाजोगाईचे नाव सर्वत्र घेतले जाते. दर्जेदार शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थामुळेही अंबाजोगाई मराठवाड्याचे 'पुणे' म्हणूनही गणले जाते.

बीड जिल्ह्यायातील महत्वाचे तालुक्याचे ठिकाण असलेल्या या अंबाजोगाईतील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकिय महाविद्यायामुळे वैद्यकीय क्षेत्रात अंबाजोगाईचे नाव सर्वत्र झाले आहे. या वैद्यकिय रूग्णालयात विविध आजारांवर उपचार घेण्यासाठी बीड जिल्ह्यासह शेजारच्या परभणी, लातूर, धाराशिव या जिल्ह्याबरोबरच मराठवाड्याच्या विविध भागातून येथे रूग्ण येतात. दररोज दीड ते दोन हजार रूग्ण येथे उपचार करून घेण्यासाठी आलेले असतात. शासनानेही येथे सर्व अद्ययावत वैद्यकिय सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्याने त्याचा रूग्णांना चांगला लाभ होतो. तज्ज्ञ डॉक्टर, चांगली सेवा यामुळे रूग्णांबरोबरच सर्वसामान्यही या रूग्णालयाचे कौतुक करत असतात. राज्य सरकारच्या वैद्यकिय विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या या रूग्णालयावर तेथील रूग्णसेवेवर, त्यांच्या औषधोपचारावर सरकार शेकडो कोटीचा खर्च करत असते.

रूग्णालय खूप मोठे असल्याने व येथील सेवेचा आवाकाही मोठा असल्याने काही उणिवा, चुका होतात तसेच इतर घडामोडी घडत असतात. यामुळे विविध कारणाने हे रूग्णालय सतत चर्चेत असते. या रूग्णालयात उपचार घेणाऱ्या रूग्णांना दिल्या जाणाऱ्या विविध औषधांपैकी काही औषधे बनावट व निष्क्रीय असल्याचे नुकतेच उघडकीस आल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाचे तत्कालीन निरीक्षक श्रीकांत पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी २३ ऑगस्ट २०२३ रोजी या रूग्णालयातील औषध भांडाराला भेट देऊन त्यातील काही औषधाचे नमुने तपासणीसाठी घेतले होते. त्याची संबंधित प्रयोग शाळेत तपासणी झाल्यानंतर आलेल्या तपासणी अहवालात या रूग्णालयात रूग्णांना दिली गेलेली काही औषधे बनावट असल्याचे नमुद केले गेले आहे. या प्रकरणी सखोल चौकशी झाली. त्यानंतर बीड येथील अन्न व औषध प्रशासन विभागाचे विद्यमाने निरीक्षक मनोज पैठणे यांनी अंबाजोगाई येथील शहर पोलिस ठाण्यात या प्रकरणाविरुद्ध फसवणुकीची तक्रार दिल्यानंतर संबंधित बनावट औषधांच्या कंपन्या व पुरवठादाराविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. यामुळे खळबळ उडाली असून या रूग्णालयास बनावट औषधांचा पुरवठा करणारी मोठी टोळी व त्यांची साखळी असल्याचे यावरून लक्षात आले आहे. सर्वसामान्य रुग्णांच्या जीवाशी हा खेळ संबंधित खेळत असून या प्रकरणी सखोल चौकशी होऊन दोषींवर कडक कारवाई झाली पाहिजे अशी मागणी सर्वसामान्यांची आहे. या प्रकारामुळे या रूग्णालयाच्या चांगुलपणाला डाग लागला असून रूग्णालयाच्या कारभारावरचा व इथल्या औषधोपचारावरचा सर्वसामान्यांचा विश्वास उडाला आहे. विविध पक्षाच्या राजकीय नेते, कार्यकर्त्यांनी या प्रकरणी सखोल चौकशीची व दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. काही राजकीय पक्षाच्या नेत्यांनी तर या प्रकरणी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

दरम्यान, आपल्याकडे औषधाची तपासणी करणाऱ्या प्रयोगशाळा मुंबई, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या तीनच ठिकाणी आहेत. त्यामुळे हा अहवाल येण्यास विलंब झाल्याचे सांगितले जाते. तर बनावट औषधे सुमारे आठ हजारावर रूग्णांना येथे दिली गेली असल्याची माहिती पुढे आली आहे. या रुग्णालयास औषध पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराने राज्यात इतर ठिकाणीही अशी बनावट औषधे दिली आहेत. अंबाजोगाईतील रूग्णालयास दिलेली औषधी कोणत्या ई-निविदेद्वारे मागवली होती, या औषधांची निर्मिती कोठे झाली, त्यासाठी लागणारा कच्चा माल, पॅकींग मटेरियल कोठून आणले गेले व औषधांची आणखीन कुठे कुठे विक्री गेली याचाही तपासण होणे गरजेचे आहे. अंबाजोगाई रूग्णालयात सापडलेली बनावट औषधे रूग्णांना दिल्याने त्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो असे माहित असूनही संबंधितांनी किती मोठे धाडस केले आहे हे पुढे येत आहे. ज्या आजारासाठी ही औषधे वापरली आहेत, त्या औषधात आजार बरा करणारे घटकच नव्हते. ही माहितीही पुढे आली आहे. रूग्णांच्या जीवावर उठण्याचा हा प्रकार आहे. अशा घटना येथे घडू नयेत म्हणून मोठी खबरदारी घेण्याचे आव्हान रूग्णालयाच्या प्रशासनापुढे आहे. ***

# बहुआयामी विचारवंत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

प्रा.डॉ.सिद्धार्थ तायडे
परळी वैजनाथ.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे क्रांतिकारी व मानवातावादी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध विषयांवर आपले विचार मांडलेले आहेत.

**शैक्षणिक विचार:-** शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी यासाठी आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व समाजात विशद केले. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो पिल तो माणूस गुरगुरल्या शिवाय राहणार नाही, असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाली की, तो किंवा ती पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावी. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे त्यांचे म्हणणे हाते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिकदृष्ट्या सशक्त होते. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाजहितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. याचे भान या प्रक्रियेत भाग घेणार्यांनी ध्यानी घ्यावे. पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन १९४६ साली करुन त्यांनी मुंबईला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलिंद महाविद्यालय सुरू केले. राष्ट्रहित व समाजहिताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय असे ते मानीत.

**राजकीय विचार:-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय विचार म्हणजे स्वराज्य, राष्ट्रवाद, लोकशाही, मूलभूत हक्क, अल्पसंख्यकाचे हितरक्षण, समाजवाद, साम्यवाद, बौद्ध धर्म इत्यादी संबंधीची विचार होते. डॉ. आंबेडकरांनी भारतातील विविध राजकीय प्रश्नासंबंधी आणि राजकीय तत्त्वज्ञानासंबंधीची मते आपल्या अनेक लेखातून, पुस्तकातून आणि भाषणांतून मांडली आहेत. तेच बाबासाहेबांचे राजकीय विचार आहेत. डॉ. आंबेडकरांचे काही राजकीय विचार हे त्यांनी घटना परिषदेच्या अधिवेशात केलेल्या भाषणातूनही व्यक्त झालेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या विचारांचा तत्कालीन राजकारणावर तसेच स्वातंत्र्याच्या राजकारणावर प्रभाव पडला आहे.

**स्वराज्यासंबंधी विचार:-** ब्रिटिश काळात सर्वच भारतीय राजकीय नेते आणि विचारवंताप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा स्वराज्यासंबंधीचे विचार



मांडले आहेत. परंतु ते विचार इतरांपेक्षा वेगळे आहेत.

**समाजवादासंबंधी विचार:-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजवादाचा पुरस्कार केला होता. परंतु त्यांना रशिया, चीन व इतर साम्यवादी देशातील एकपक्ष पद्धतीचा समाजवाद मान्य नव्हता. देशातील समाजवादी व्यवस्था, राजकीय तसेच आर्थिक क्षेत्रात लोकशाहीचा स्वीकार करून आणि उद्योगधंद्यावर सरकारची मालकी प्रस्थापित करून समाजवादी व्यवस्था प्रस्थापित होऊ शकते. असे त्यांना वाटत होते.

**साम्यवादासंबंधी विचार:-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही समाजवादाचा पुरस्कार केला होता. त्यामुळे त्यांना मार्क्सवाद किंवा साम्यवादाचा विचार विचार अपूर्ण आणि सदोष वाटत होता. डॉ. आंबेडकरांनी साम्यवादावर आणि रशियातील साम्यवाद पद्धतीवर जोरदार टीका केली होती. साम्यवादातील दोष दाखविताना त्यांनी म्हटले होते की, १) साम्यवादात केवल आर्थिक किंवा भौतिक जीवनाला महत्त्व दिले जाते. २) साम्यवाद धर्मविरोधी आहे. ३) साम्यवाद स्वातंत्र्यविरोधी आहे. साम्यवाद लोकशाहीच्यै विरोधात आहे. ४) साम्यवादी राष्ट्रांनीसुद्धा साम्राज्यवादी धोरण स्वीकारुन अनेक लहान-लहान राष्ट्रांना आपल्या नियंत्रणाखाली ठेवले आहे.

**सामाजिक विचार:-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या एकदंर कार्यात सामाजिक सुधारणांना विशेषतः दलितोद्धाराच्या चळवळीला विशेष महत्त्व आहे. एका अस्पृश्य कुटुंबात जन्मल्याने त्यांना अस्पृश्यतेचे अनेक वाईट अनुभव आले होते. म्हणूनच त्यांनी अस्पृश्यता नष्ट करणे आणि अस्पृश्यता नष्ट करणे आणि अस्पृश्यांचा सर्वांगीण विकास करणे हे आपल्या जीवनाचे पहिले ध्येय ठेवले होते.

**समाजसुधारणाविषयक विचार:-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समाजसुधारणाविषयक दृष्टिकोण एकोणिसाव्या शतकातील नेमस्त सुधारणांपेक्षा गुणात्मकदुष्ट्या भिन्न होता. नेमस्त सुधारकांनी सुचविलेल्या सुधारणा विधवा विवाह, केशवपन, विवाहाची वयोमर्यादा इत्यादी कौटुंबिक सुधारणासंबंधी होत्या. त्यामुळे त्या सुधारणांमधून मूलभूत अशा सामाजिक सुधारणा झालेल्या नाहीत. मूलभूत प्रश्न सुटलेला नाही असे मत डॉ. आंबेडकरांनी या संदर्भात व्यक्त केले आहे. इतर लहान लहान सामाजिक सुधारणा होण्यासाठी मुळात सामाजिक विषमतेचा प्रश्न सुटला पाहिजे असे त्यांना वाटप होते. नेमस्त तो सुधारक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचात आणखी एक मुख्यतः फरक म्हणजे नेमस्त सुधारकांनी सुधारणांसाठी प्राचीन धर्मग्रंथांचा आधार घेतला आहे. यावर मात्र डॉक्टर आंबेडकरांना विश्वास नव्हता. अस्पृश्यता मान्य करणाऱ्या 'मनुस्मृती' या ग्रंथाची त्यांनी होळी केली होती. त्या काळातील नेमस्त तो सुधारक आणि डॉक्टर आंबेडकर यांच्या समाज सुधारणा दृष्टिकोणाबाबतचा आणखी एक फरक म्हणजे नेमस्तक सुधारकांचा हृदय परिवर्तनावर विश्वास होता. डॉ. अंबेडकरांना मात्र हृदय परिवर्तनावर मर्यादा असतात असे वाटत होते.

**आर्थिक विचार:-** भारताच्या कीर्तिवंत सुपुत्रांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव अग्रस्थानी आहे. भारत देशाच्या इतिहासातील पहिले सर्वश्रेष्ठ अर्थशास्त्रज्ञ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. देशाच्या सामाजिक-राजकीय क्षितिजावर त्यांचा उदय इ.स. १९२० च्या दशकात झाला. समाजाच्या, अस्पृश्य म्हणून हिणविल्या गेलेल्या अगदी तळातील वर्गाच्या पुनरुत्थानासाठी सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि धार्मिक पातळीवर तेव्हापासूनच त्यांचा संघर्ष सुरू होता. बाबासाहेब एक थोर

(उर्वरित पान ३ वर)

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com

* वर्ष ०८ * अंक ३२ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. ०९ डिसेंबर २०२४ * किंमत : २ रू.

(पान १ वरुन)...

**बहुआयामी विचारवंत : डॉ.बाबासाहेब आंबेडकर**

विचारवंत होते आणि त्यांनी अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, विधिज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, पत्रकार, संसद सदस्य आणि या सर्वांच्या पलीकडे जाऊन समाजसुधारक आणि मानवाधिकारांचा रक्षक या नात्याने केलेले कार्य अतुलनीय आहे. देशभरातील अस्पृश्य समाजाला एकवटून, संघटित करून सामाजिक समतेच्या ध्येयाप्रत जाण्याच्या दृष्टीने राजकीय मार्ग कसा अवलंबायचा, याविषयी त्यांनी दिशादर्शन केले.

अस्पृश्य समाजात मध्ये जन्मलेल्या बाबासाहेबांनी देश-विदेशातल्या तीन खंडांतून उच्च शिक्षण प्राप्त केले. कोलंबिया विद्यापीठाची अर्थशास्त्रातील पीएच. डी. (१९१७), लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून डॉक्टर ऑफ सायन्सची पदवी तसेच लंडनमधील ग्रेज इन्वी बार ॲट लॉ (१९२३) अशा अतिउच्च पदव्या त्यांनी संपादित केल्या. दलित समाजातील विद्यार्थ्याने त्या काळात अशा प्रतिष्ठेच्या पदव्या मिळविणे ही अद्वितीय बाब होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मूळ अभ्यासविषय अर्थशास्त्र हाच होता. बाबासाहेबांनी अर्थशास्त्रात विपुल लिखाण केले असून, या विषयावर त्यांची तीन प्रमुख पुस्तके आहेत. : १) ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी, २) दि इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया आणि ३) दि प्रॉब्लेम ऑफ द रुपी : इट्स ओरिजिन ॲन्ड इट्स सोल्यूशन. पहिली दोन पुस्तके सार्वजनिक वित्तव्यवस्थेवरील असून, त्यातील पहिल्या पुस्तकात ईस्ट इंडिया कंपनीच्या इ स. १७९२ ते इ.स. १८५८ या काळातील वित्तव्यवहारावर भाष्य केले आहे. दुसरे पुस्तक ब्रिटिशांच्या आमदनीतील भारतात वित्तीय व्यवहारांमधील केंद्र आणि राज्य संबंधांवर भाष्य करते. हा कालखंड इ.स. १८३३ ते इ.स. १९२१ असा आहे. त्यांचे तिसरे पुस्तक चलनविषयक अर्थशास्त्रावरील एक उत्कृष्ट ग्रंथ मानला गेला आहे. या पुस्तकात इ.स. १८०० पासून इ.स. १८९३ पर्यंतच्या कालखंडात विनिमयाचे माध्यम म्हणून भारतीय चलनाची कशी उत्क्रांती झाली, हे बाबासाहेबांनी सांगितले आहे. तसेच १९२० च्या दशकाच्या पूर्वार्धात सुयोग्य चलनाची निवड करण्यात आलेल्या अडथळ्यांचीही चर्चा त्यांनी केली आहे. भारतात परतल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्रावर एकही पुस्तक लिहिले नाही. मात्र, त्यांच्या कार्याचा आढावा घेतल्यास त्यांच्यातील अर्थतज्ज्ञ वारंवार डोकावत राहतो.

बॉम्बे लेजिस्लेटिव्ह असेम्ब्लीचे सदस्य असताना (१९२६) ग्रामीण भागातील गरिबांच्या समस्यांविषयीचे त्यांचे समग्र आकलन त्यांनी उभारलेल्या जनआंदोलनांमध्ये प्रतिबिंबित होते. शेतीमधील खोती पद्धतीविरुद्ध त्यांनी केलेल्या यशस्वी आंदोलनामुळे अनेक ग्रामीण गरिबांची आर्थिक शोषणातून मुक्तता झाली. महार वतन या नावाखाली सुरू असलेल्या शुद्ध गुलामगिरीविरुद्ध त्यांनी आवाज उठविल्यानंतर ग्रामीण भागातील गरिबांचा मोठा वर्ग शोषणमुक्त झाला. सावकारांच्या मनमानीला चाप लावण्यासाठी त्यांनी असेम्ब्लीमध्ये विधेयक आणले. औद्योगिक कामगारांच्या क्षेत्रात डॉ. आंबेडकरांनी इ.स.१९३६ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. त्याकाळी कामगारांचा आवाज बुलंद करणार्‍या अन्य संघटना होत्याच; मात्र त्यांना अस्पृश्य कामगारांच्या मानवाधिकारांशी काहीही देणे-घेणे नव्हते. नव्या राजकीय पक्षाने ही उणीव भरून काढली. त्याचप्रमाणे व्हॉइसरॉयज् एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे कामगार सदस्य या नात्याने १९४२ ते १९४६ या काळात डॉ. आंबेडकर यांनी कामगारविषयक धोरणात आमूलाग्र सुधारणा घडवून आणल्या. त्यात सेवायोजन कार्यालयाची स्थापना ही महत्त्वपूर्ण घटना होती आणि स्वतंत्र भारतातील औद्योगिक संबंधांची तीच पायाभरणी ठरली. बाबासाहेबांनी पाटबंधारे, ऊर्जा आणि इतर सार्वजनिक बांधकामे ही खातीही सांभाळली. देशाचे पाटबंधारे धोरण निश्चित करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दामोदर व्हॅली प्रकल्पाचा यात प्राधान्याने समावेश करावा लागेल.

जाती व्यवस्था आणि अस्पृश्यतेसारख्या सामाजिक आजारांचे आर्थिक पैलू उलगडून दाखविणे, हे डॉ. आंबेडकरांचे आणखी एक विद्वत्तापूर्ण कार्य होय. श्रमविभागणीच्या तत्त्वानुसार महात्मा गांधींनीही जाती व्यवस्थेचे अस्तित्व स्वीकारले होते. मात्र, आंबेडकरांनी ‘जातींचे विध्वंसन’ या आपल्या ग्रंथात त्यावर कडाडून टीका केली होती. जाती व्यवस्थेमुळे केवळ श्रमाची विभागणी केली गेली नसून, श्रमिकांचीच विभागणी केली गेली आहे, हे त्यांनी निदर्शनास आणून दिले. डॉ. आंबेडकरांचा जाती व्यवस्थेवरील हल्ला हे केवळ उच्चवर्णीयांच्या वर्चस्ववादाला दिलेले आव्हान नव्हते, तर आर्थिक विकासाशी त्यांच्या मांडणीचा जवळचा संबंध होता. जाती व्यवस्थेमुळे श्रमाची आणि भांडवलाची गतिशीलता कमी झाली असून, त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि विकासावर प्रतिकूल परिणाम झाला आहे, असे त्यांचे प्रतिपादन होते.

स्टेट्स ॲन्ड मायनॉरिटीज नावाने ब्रिटिश सरकारला इ.स.१९४७ साली सादर केलेल्या टिपणामध्ये भारताच्या आर्थिक विकासाची योग्य धोरणे कोणती, हे सांगितले होते. अत्युच्च उत्पादन क्षमतेचा विचार करून लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियोजन करणे तसेच खासगी उत्पादकांना कोणतीही आडकाठी न करता आणि संपत्तीचे समान वाटप होईल अशारीतीने आर्थिक नियोजन करणे हे सरकारचे दायित्व आहे, असे त्यांनी नमूद केले होते. स्वातंत्र्यानंतर डॉ. आंबेडकर भारताचे पहिले कायदामंत्री बनले. इ.स. १९४८-४९ मध्ये घटना समितीचे अध्यक्ष म्हणून भारतीय राज्यघटनेला आकार देतानाही त्यांच्यातील अर्थतज्ज्ञ आपल्याला दिसून येतो. मानवी अधिकारांचे मूलतत्त्व म्हणून त्यांनी लोकशाही राज्यव्यवस्थेचा ताकदीने पुरस्कार आणि पाठपुरावा केला. समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या तीन लोकशाही तत्त्वांचा केवळ राजकीय हक्क असा संकुचित अर्थ लावला जाऊ नये, असे त्यांनी म्हटले आहे. सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचे ते खंदे पुरस्कर्ते होते आणि सामाजिक-आर्थिक लोकशाहीकडे दुर्लक्षून राजकीय लोकशाही टिकू शकणार नाही, असा इशाराही द्यायला ते विसरले नाहीत.

डायरेक्टिव्ह प्रिन्सिपल्स ऑफ दि स्टेट पॉलिसी हा अनुच्छेद घटनेत समाविष्ट करून त्यांनी आर्थिक लोकशाहीचा हेतू विषद केला. कायदामंत्री या नात्याने डॉ. आंबेडकर यांनी हिंदू कोड बिल संमत करण्यासाठी मोठा संघर्ष केला. महिलांचे अधिकार, विशेषतः विवाह आणि पितृसंपत्तीविषयक अधिकार सुरक्षित करणारी ही मोठी सामाजिक सुधारणा होती. हे विधेयक संसदेत संमत होऊ शकले नाही, म्हणून सप्टेंबर इ.स.१९५१ मध्ये त्यांनी राजीनामा दिला.

**सारांश:-** डॉ. आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व अनेक पैलूंनी युक्त असले तरी त्यात एक समान धागा होता आणि तो आर्थिक हित पाहणारा होता. ‘बहुजन हिताय, बहुजन सुखाय’ या त्यांनी दिलेल्या मंत्रातूनच त्यांचे आर्थिक विचार सुस्पष्टपणे दिसून येतात. आंबेडकरांचे विचार सामाजिक, धार्मिक आणि नैतिक तत्त्वांवर आधारलेले आहेत. शोषक आणि शोषित हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू आहे. दबलेल्यांना उभारी देणे आणि शोषितांची जोखडातून मुक्तता करणे हाच त्यांच्या विचारांचा मूलाधार आहे. सर्वांना स्वातंत्र्य, समता आणि न्याय मिळावा, हाच त्यांच्या वैचारिक मांडणीचा प्रमुख हेतू आहे. ****